महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीची (महानिर्मिती कंपनी) खापरखेडा संच क्र.५ प्रकरणी प्रकल्पाची भांडवली किंमत आणि आर्थिक वर्षे २०१२-१३ चा वीजदर निश्चितीकरणासाठी याचिका

## (वर्ष २०१३ चे प्र.क्र.४४)

## कार्यकारी सारांश

# *कार्यकारी सारांश*

**प्रकल्पाचा आढावा:**

महानिर्मितीने खापरखेडा संच ५,(५०० मे.वॅ.) हा दि.१६ एप्रील २०१२ रोजी कार्यान्वीत करून राज्यातील वीज पूरवठा आणि मागणी या मधील तफावत कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. हया संचातून निर्माण होणारी वीज ही महावितरण कंपनीला पूरवली जाते.

महानिर्मितीने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१ व ६२ आणि ८६(१)(अ)(ब) आणि वीज नियामक आयोगाच्या (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम,२००५ चा भाग ई अन्वये मा.आयोगासमोर खापरखेडा संच ५ करीता भांडवली खर्च आणि आ.व.२०१२-१३ चा वीजदर ठरवण्यासाठी याचिका सादर केली आहे.

**प्रकल्पाचा भांडवली खर्च:**

वस्तूनिष्ठता आणि किमान किंमतीच्या तत्वाची खात्री करण्यासाठी, महानिर्मितीने हया प्रकल्पाची मुख्य संयंत्र आणि याच्याशी निगडीत इतर साहाय्यकारी आणि इतर भाग विकत घेण्यासाठी परंपरागत पध्दतीने म्हणजेच स्पर्धात्मक लिलावाच्या प्रक्रीयेद्वारे निवीदा मागविण्याचा मार्ग स्विकारला होता. मे. भारत हेवी इलेक्ट्रीकल कंपनीला मुख्य संचाचा पुरवठा आणि उभारणी करीता आंतरराष्ट्रीय लिलावातून कंत्राट दिला. मे. बि.जी.आर. एनर्जी सिस्टीमला इतर संयंत्र (Balance of Plant) आणि सयंत्राच्या उभारणीसाठी इमारतीचा सांगाडा आणि स्थापत्य कामे ही देशातील स्पर्धात्मक लिलावातुन कंत्राट दिले. उरलेली स्थापत्य कामे जसे की, रेल्वे साईडींग, कर्मचा-यांची घरे इत्यादी करीता इतर कंत्राटदारांना कंत्राट दिले.

वीज विनीयमाप्रमाणे प्रकल्पाचा भांडवलीखर्च हा मा. आयोगाच्या आवश्यक छाननीनंतर प्रकल्पाच्या व्यापारी तत्वावर चालविण्याच्या घोषीत तारखेपर्यंत प्रत्यक्ष झालेला खर्च होय. व्यापारी तत्वावर चालवण्याच्या तारखेला प्रत्यक्ष्य प्रकल्पाची किमंत ही रू.३३७६.९० कोटी असून त्यात संयंत्राची किंमत रू.२७०९. ५५ कोटी आणि उभारणी काळातील व्याज (IDC) हे ६६७.३५ कोटी समाविष्ट आहे.

| **तपशील** | **(रू.कोटी)** |
|---|---:|
| जमिन आणि साईट विकास किंमत | २९.०० |
| बाष्पक,चलित्र,जनित्र | १४२७.१४ |
| इतर यंत्र सामूग्री | ६४१.८० |
| स्थापत्य कामे | ४८३.९६ |
| बांधकाम आणि बांधकाम आगोदरची कामे | ४०.११ |
| उपरी खर्च | ८७.५३ |
| उभारणी काळातील व्याज | ६६७.३५ |
| **एकूण** | ३३७६.९० |

महानिर्मितीने दिर्घमुदतीच्या कर्जा करीता रू.२५७६.०० कोटीचा पॉवर फायनांन्स कॉर्पोरेशन बरोबर करार केला. त्यापैकी महानिर्मितीने संच व्यापारी तत्वावर चालवण्याच्या तारखेपर्यंत (CoD) रू.२२८३.३० कोटी उचल केली होती. कंपनीची अमुक्त उत्तरदायीत्व (विविध कत्राटदारांच्या राखून ठेवलेल्या रक्कमासहीत) व्यापारी तत्वावर चालवण्याच्या तारखेला ४१५.६३ कोटी रू. लेखा पूस्तकात दाखवली आहे. महाराष्ट्र शासनाकडून भागभांडवल म्हणून रू.५९९.३७ कोटी मिळाले आणि उरलेली रक्कम रू. ७८.६० कोटी ही कंपनीच्या आंतरीक स्त्रोतातून वळती केली आहे. खालील तक्त्यात सखोल वित्तीय नियोजन नमूद केले आहे.

| तपशील | किंमत (रू.कोटी) | % |
|---|---|---|
| कर्ज | २२८३.३० | ७७.११ |
| शासनाचे भागभांडवल | ५९९.३७ | २२.८९ |
| अंतर्गत स्त्रोत | ७८.६० | |
| अमुक्त उत्तरदायीत्व * | ४१५.६३ | |
| एकूण | ३३७६.९० | १००.०० |

*अमुक्त उत्तरदायीत्वाच्या या वर्गवारीत कुठलाही निधी दाखवीलेला नाही व व्याज किंवा भागभांडवलावरील परताव्याची मागणी केलेली नाही.

प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण व्हावा या उद्देशाने महानिर्मितीने एकूण ४२ महिन्यात प्रकल्प पुर्ण होईल असे उद्दिष्ठ ठेवले होते, परंतु वस्तुस्थिती लक्षात घेता सरासरी पूर्णत्वाचा काळ हा सरासरी ५५-६० महिन्यात पुर्ण होतो हे याचिकेत विस्तृतपणे मांडले आहे. प्रकल्प पुर्णत्वाचा सरासरी काळ, वरील प्रमाणे असून सुध्दा प्रकल्प भेल, बीजीआर आणि इतर कंत्राटदार यांच्या पुरवठयात उशीर झाल्या नंतर सुध्दा प्रकल्प हा ६३ महिन्यात पुर्ण झाला. महानिर्मितीने हया बाबत केलेले प्रयत्न आणि हया विषयी विस्तृत माहिती याचिकेत सादर केली आहे.

परंतु ग्राहक हित लक्षात घेता महानिर्मितीने कंत्राट कराराप्रमाणे काटेकोर उपाययोजना केल्या आणि विविध कंत्राटदाराचे सुमारे २३०.७५ कोटी रू. (Liquidated damages)च्या नावे हे स्वत:जवळ राखून ठेवले आहेत.

**<u>आ.व.२०१२-१३ ची एकूण महसूलाची आवश्यकता.</u>**

संच व्यापारी तत्वावर कार्यान्वित तारखेला महानिर्मितीचा मे. एमसीएल कंपनी बरोबर २.३१२ द.ल.मे.टन देशी कोळसा पूरवण्याचा सामंजस्य करार होता. या सामंजस्य करारापैकी किमान ७०% म्हणजेच १.६१८४ द.ल.मे.टन देशी कोळसा मिळावयास पाहीजे होता. परंतु इंधन पूरवठा कराराच्या फक्त ५०% कोळशाचाच पूरवठा झाला. त्यामुंळे आ.व. २०१२-१३ या कालावधीत कमी प्रमाणात विजनिर्मिती झाली. परंतु नोव्हेंबर २०१२ पासून संचालन घटकाची सुरूवातीला असलेल्या त्रृटीची भरपाई होऊन आणि आयात कोळश्याचा वापर करून संचाच्या कामगिरीत चांगलीच वाढ झाली.

**महानिर्मितीने आ.व.२०१२-१३ करीता** (**अलेखापरिक्षीत** प्रत्यक्ष स्थिरीकरणाच्या काळात आणि स्थिरीकरणानंतरच्या काळात) **प्रत्यक्ष कामगिरी घटक खालील प्रमाणे आहेत**.

**तक्ता:**

| तपशील | एकके | स्थिरीकरणाच्या काळात (१६/४/२०१२-१२/१०/२०१२) | स्थिरीकरणानंतर (१३/१०/२०१२-३१/३/२०१३) | एकूण (१६/४/२०१२-३१/३/२०१३) |
|---|---|---|---|---|
| | | **अलेखापरिक्षीत प्रत्यक्ष** | **अलेखापरिक्षीत प्रत्यक्ष** | **अलेखापरिक्षीत प्रत्यक्ष** |
| उपलब्धता | % | ३२.८५ | ७३.६७ | ५१.६८ |
| सयंत्र भार | % | ३२.८५ | ७३.६४ | ५१.६८ |
| एकूण वीजनिर्मीती | द.ल युनिट | ७३७.०८ | १४३३.६२ | २१७०.७० |
| सहाय्यकारी उर्जाचा वापर | % | ११.४५ | ६.५८ | ८.२४ |
| संचाचा उष्मांक | कि.वॅ./युनिट | २८१४.०० | २५१९.१९ | २६१९.२७ |
| दुय्यम इंधनाचा वापर | मीली. ली /युनिट | १५.३२ | २.३९ | ६.७८ |

महानिर्मितीने ३१ जानेवारी २०१३ रोजी मे. एमसीएल कंपनीशी २.३१२ द.ल.मे.टन कोळसा पूरवठा करण्यासंबंधी इंधन पूरवठा करार केला. मा. राष्ट्रपतींच्या निर्देशांनुसार एमसीएल कंपनीने कमीत कमी ८०% पूरवठा करायला पाहीजे. महानिर्मिती कंपनी भविष्यात कामगिरी घटकांच्या प्रमाणकानुसार उद्दिष्टे पूर्ती मिळवण्यासाठी योग्य त्या कोळसामिश्रणाचे अवलंबन करेल. कोळश्याच्या पूरेशा गूणवत्तेवर आणि मात्रेच्या उपलब्धेनुसार संचांच्या कामगिरीत प्रगती होईल. तथापि सध्यास्थितीत अपूऱ्या कोळशाची समस्या ही नजीकच्या काळात टिकून राहण्याची शक्यता आहे.

**आर्थिक वर्ष २०१२-१३ प्रेक्षेपितसाठीचा खर्चाचा गोषवारा, खालील तक्त्याप्रमाणे**

| **तपशील** | **एकके** | **आर्थिक वर्ष २०१२-१३** |
|---|---|---|
| घसारा | रू. कोटी | ११६.५६ |
| घसाऱ्याच्या अग्रिमासहीत | रू. कोटी | ३.७८ |
| संचलन व सुव्यवस्था खर्च | रू. कोटी | ७८.०१ |
| दिर्घकालीन कर्जावरील व्याज | रू. कोटी | २६३.३२ |
| खेळत्या भाडंवलावरील व्याज | रू. कोटी | ३७.९८ |
| भाग भांडवलावरील परतावा | रू. कोटी | ८०.४६ |
| आयकर | रू. कोटी | १६.१० |
| **एकूण स्थिर आकार** | रू. **कोटी** | **५९६.२१** |
| एकूण अस्थिर आकार | रू. कोटी | ५८९.८९ |
| **एकूण आकार** | रू. **कोटी** | **११८६.०९** |

| तपशील | संच | २०१२-१३ |
|---|---|---|
| **निव्वळ विजनिर्मिती (सहाय्यकारी विज वगळून)** | द.ल.युनिट | १९९१.९३ |
| अस्थिर खर्च | रू/युनिट | २.९६ |

भविष्यात पूरेशा गूणवत्तेच्या आणि योग्य मात्रेच्या कोळशाच्या उपलब्धतेत सुधारणा झाल्यास संचाच्या कामगिरीमध्ये सुधारणा होवून प्रतियुनिट वीजदर कमी होऊ शकतो.

वरील सादर केलेले प्रतियुनिट वीजदर हे महावितरण कंपनीला प्रत्यक्ष वीजदर म्हणून लागू नाहीत. महानिर्मिती असे स्पष्टीकरण देते की, मा. आयोगाने मान्य केलेलेच वीजदर महावितरण कंपनीला लागू राहील.

वरील सादरीकरण हे फक्त आ.व.२०१२-१३ च्या अंदाजीत खर्चावर अवलंबून आहे. जे मा. आयोगाच्या योग्य छाननीनुसारच ठरेल.

महानिर्मिती मा. आयोगाला अशी विनंती करते की, वरील सादरीकरणाचा योग्य विचार करून हया याचिकेत सादर केलेली किंमत मान्य करावी.

## :: प्रार्थना ::

**माननिय आयोगाला सविनय विनंती आहे की:**

१) प्रकल्पाचा भांडवली खर्च आणि आ.व. २०१२-१३ करीता विजदराला मान्यता द्यावी.

२) महानिर्मितीला खापरखेडा संच क्र.५ चा वीजदर मान्य करण्यासाठी याचिकेसंबंधी अतिरीक्त सादरीकरण करण्याची मुभा द्यावी.

३) मा. आयोगाने वीजदर ठरवितांना वापरलेले वर्कबल एक्सेल मॉडेल द्यावे ही विनंती.

४) विनंती अर्जातील त्रृटी क्षमापित कराव्यात आणि नंतरच्या टप्प्यात आवश्यकते प्रमाणे अतिरिक्त माहिती/आधारसामग्री सादर करण्यास महानिर्मितीला परवांनगी द्यावी.

५) महानिर्मितीच्या संचाला जो वीजदर मा.आयोग मान्य करेल त्या प्रमाणे महावितरण कडून अस्थिर दर आणि स्थिर आकार आदेशाच्या निर्गमाच्या तारखेपासून वसूल करण्याची परवांनगी द्यावी.

६) हया आदेशाच्या तारखेपासून संबंधीत आ.वर्षाच्या आत महानिर्मितीचा थकबाकी देण्याकरीता महावितरण कंपनीला योग्य ते निर्देश द्यावेत.

७) महानिर्मितीला सध्या स्थितीतील वीजदर/तात्पूरता वीजदर आणि या याचिकेत मान्य केलेला अंतीम वीजदर या मधील तफावतीच्या रक्कमेचा आदेशाच्या तारखेपासून वसूल करण्याची परवांनगी द्यावी.

८) मा.आयोगाला जे योग्य वाटेल त्याप्रमाणे पुढील आदेश द्यावे.